# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२११५५१/२१/अ.क्र.४३६/२५/०१

**श्री. जिग्नेश शर्मा**
जी-१, जोशी भवन, गोल गॉर्डन जवळ,
पोद्दार रोड, मालाड (पु), मुंबई ४०० ०९७.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि-१) के/पूर्व**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पु) मुंबई – ४०० ०६९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पु) मुंबई – ४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०८.०५.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०२.२०२० | - | ३०.०९.२०२० | २३.१०.२०२० |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.०२.२०२० रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "ट्रेंचेस कामासंबंधित" माहितीची मागणी केली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

त्यानंतर अपीलार्थी यांनी दि. ३०.०९.२०२० रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "आजपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर "जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी यांना सात दिवसांत निरीक्षणांसाठी बोलविण्यात यावे व निरिक्षणांनंतर चलन शुल्क भरुन त्यांना आवश्यक असलेल्या माहिती अधिकाऱ्यांच्या प्रती देण्यात याव्यात", असे आदेश पारित केले आहे.

तद्नंतर अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि. ३१.०३.२०२१ रोजी "जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि. ०८.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित यांना सुनावणी नोटीस प्राप्त असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणी अपीलार्थी यांनी ट्रेंचेस कामासंबंधित मुद्येनिहाय माहितीची मागणी केली आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) के/पूर्व विभाग यांनी प्रतिसाद दिला असून मागणी केलेली माहिती अतिशय व्यापक व विस्तृत स्वरुपाची असल्याकारणाने अपीलार्थी यांनी कार्यालयीन अभिलेखाचे निरिक्षण करुन विहीत शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे उत्तर दिले आहे.

अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपीलार्थी यांनी द्वितीय अपील अर्ज सादर केला असून त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) के/पूर्व विभाग व प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांनी अपीलार्थी यांना माहितीचे निरिक्षण करण्याकरिता संधी देण्यात आली होती. तेव्हा अपीलार्थी माहितीच्या निरिक्षणाकरिता उपस्थित राहिले नाही. यावरुन असे स्पष्ट होते की, अपीलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यात कोणताही स्वारस्य दिसून येत नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) के/पूर्व विभाग यांनी अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन त्या दिवशी स्वत: कार्यालयात उपस्थित राहून मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनाअंती अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेल्या १०० पृष्ठांची माहिती त्यांना विनामुल्य प्रदान करावी व उर्वरीत पृष्ठांकरीता शुल्क आकारावेत. या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०८.०५.२०२५**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**